# कथा

## भारताच्या महान स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात नायकांच्या

### एक राणी जी कधीही झुकली नाही – बेगम हजरत महल

***ठिकाण:*** *लखनऊ, उत्तर प्रदेश*



थोडा वेळ डोळे मिटा आणि विचार करा — वर्ष 1857, चारही बाजूंनी हलकल्लोळ माजला आहे. भारतातील लोक गुलामीच्या साखळ्या तोडण्यासाठी उभे ठाकले आहेत. झाशीमध्ये लक्ष्मीबाई तलवार घेऊन रणांगणात आहेत, आणि दुसऱ्या बाजूला — लखनौमध्ये अजून एक राणी उभी ठाकली आहे — त्यांचं नाव आहे बेगम हजरत महल.

इंग्रजांनी त्यांचे पती, नवाब वाजिद अली शाह, यांना सत्तेतून दूर करून कलकत्त्याला पाठवले. **अशा वेळी बेगम हजरत महल यांनी लढण्याचा निर्णय घेतला.**

त्यांनी आपल्या लहान मुलाला, जो त्यावेळी फक्त ११ वर्षांचा होता, लखनौचा राजा घोषित केले. आणि **स्वतः लढाईच्या सरदार बनल्या.** त्यांनी लखनौमधील सामान्य लोकांना एकत्र केले, शिपायांना प्रशिक्षण दिले आणि इंग्रजांशी दोन हात केले. त्यांच्या नेतृत्वाची ताकद इतकी अफाट होती की **काही काळासाठी इंग्रजांना लखनौ सोडून पळ काढावा लागला.**

पण, इंग्रज एक फार मोठी सेना आणि कुटनितीसोबत परत आले. त्यांनी लखनौवर पुन्हा हल्ला चढवला. बेगम घाबरल्या का? नाही! **घोड्यावर बसून, तलवार हातात घेऊन, गावोगाव फिरून त्यांनी लोकांचा हिंमत दिली.** त्यांनी हिंदू-मुस्लिम सगळ्यांना एकत्र घेऊन लढा दिला.

जेव्हा इंग्रजांच्या अखेरच्या हल्ल्यात सर्व काही उद्ध्वस्त झाले, तेव्हा त्या नेपाळला गेल्या. तिथे त्यांनी आश्रय घेतला — पण कधीही इंग्रजांची माफी मागितली नाही, पुन्हा राणी होण्यासाठी याचना केली नाही, आणि आपल्या देशाशी गद्दारी केली नाही.

**शिकवण:** खरं नेतृत्व तेच जे संकटातही ठाम राहतं. एखादी स्त्रीही सेनेचे नेतृत्व करू शकते आणि इंग्रजांशी लढू शकते. देशभक्ती म्हणजे — परिस्थिती कितीही वाईट असली तरी देशासाठी लढताना कधीही हार न मानणे.


आज आपण मोकळ्या हवेत श्वास घेतो आहोत. तेव्हा हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे की आपल्या स्वातंत्र्यात फक्त पुरुषांचीच नाही, तर शूर स्त्रियांचीही तितकीच हिस्सेदारी आहे.

# कथा

## भारताच्या महान स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात नायकांच्या

### पुस्तकांचा क्रांतिकारी – पीर अली खान यांची कथा

***ठिकाण:*** *पाटना, बिहार*



खूप वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. ही कथा आहे एका शूर पुस्तकवाल्याची — पीर अली खान यांची. ते पुस्तके विकत असत, पण त्यांच्या मनात स्वातंत्र्याची मशाल पेटलेली होती.

सन् 1812 मध्ये, पीर अली खान यांचा जन्म पाटणा येथे झाला. ते व्यापारी होते आणि पुस्तकांची एक छोटीशी दुकान चालवत होते. बाहेरून ते साधे माणूस दिसत, पण आतून ते एक ज्वालामुखी होते — इंग्रजांच्या अन्यायाविरुद्ध फुटण्यासाठी तयार.

1857 मध्ये जेव्हा देशभर बंडाची लाट उसळली — ज्याला आपण आज 'पहिला स्वातंत्र्यलढा' म्हणतो — तेव्हा पीर अली खान यांनी इंग्रजांविरुद्ध लोकांना संघटित करणे सुरू केले. ते इंग्रजांविरुद्ध गुप्त संदेश पोहोचवत, लोकांना जागरूक करत आणि क्रांतीची योजना आखत. ते फैजाबादच्या मौलवी अहमदुल्ला शाह यांचे घनिष्ठ सहकारी होते आणि बिहारपासून उत्तर भारतापर्यंत क्रांतिकारकांचे एक मजबूत जाळे उभारले होते.

पण इंग्रजांना संशय आला. पाटण्यात त्यांच्या दुकानावर छापा टाकला गेला. तिथून क्रांतिकारी पत्रके, पत्रे आणि योजना सापडल्या. पीर अली यांना अटक करण्यात आली. त्यांच्यावर देशद्रोहाचा खटला चालवण्यात आला.

जेव्हा त्यांना न्यायालयात उभे केले गेले, तेव्हा त्यांनी न घाबरता सांगितले: "मी भारताच्या स्वातंत्र्यासाठी काम केले आहे. हे माझे कर्तव्य होते — कुठलाही गुन्हा नाही."

18 जुलै 1857 रोजी पाटण्यात, सर्वांसमोर त्यांना फाशी देण्यात आली. पण त्यांच्या मृत्यूने लोक घाबरवण्याऐवजी, पाटण्यात आणखी बंडे पेटली. आज कदाचित इतिहासाच्या पुस्तकांत त्यांचे नाव छोट्या अक्षरांत लिहिले असेल — पण स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात पीर अली खान कायमचे अमर आहेत.


**शिकवण:** त्यांचे साहस आपल्याला शिकवते की, जर छातीत हिम्मत आणि मनात देशाविषयी प्रेम असेल एक साधा पुस्तकवाला देखील इतिहास बदलू शकतो.

# कथा

## भारताच्या महान स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात नायकांच्या

### कैप्टन भाऊ आणि तूफान सेनेची कहाणी

***ठिकाण:*** *सातारा, महाराष्ट्र*



खूप वर्षांपूर्वीची गोष्ट आहे, तेव्हा भारत इंग्रजांच्या गुलामीत होता. इंग्रज आपल्या देशाची संपत्ती लुटत होते आणि जो विरोध करत असे, त्याला तुरुंगात टाकत. पण एक ठिकाण होते – सातारा – जिथे काही धाडसी लोक गप्प बसले नव्हते. तिथे एक गुप्त सरकार स्थापन झाले होते. त्याचे नाव आहे– प्रति सरकार. हे सरकार लपून काम करत असे, गरीबांची मदत करत असे, आणि इंग्रजांना चकवा देत असे.

याच सरकारमध्ये होते एक धाडसी तरुण – रामचंद्र श्रीपती लाड. सगळे त्यांना प्रेमाने कॅप्टन भाऊ म्हणत.

कॅप्टन भाऊ साधे-सुधे नेता नव्हते. त्यांनी मुलं आणि किशोरवयीन मुलांची एक टोळी तयार केली. त्याचे नाव त्यांनी ठेवले होते – तुफान सेना! या सेनेत १० ते १६ वर्षे वयोगटातील मुले होती, जी न घाबरता इंग्रजांविरुद्ध काम करत – चिठ्ठ्या पोहोचवत, गुप्त माहिती देऊन लोकांना सावध करत, आणि गरज पडल्यास शस्त्रास्त्रही आणत. तुफान सेनेत फक्त मुलेच नव्हे, तर किशोर, तरुण आणि काही जेष्ठ लोकही होते.

७ जून १९४३ च्या रात्रीची गोष्ट. भाऊ आणि त्यांच्या साथीदारांनी शेणोली रेल्वे स्थानकावर एक ट्रेन थांबवली. त्या ट्रेनमध्ये इंग्रजांचा खजिना आणि महत्त्वाचा माल होता. भाऊ आणि त्यांच्या सोबत्यांनी तिकीट खिडकी उघडली, पैसे काढले आणि प्रति सरकारला दिले. त्या पैशांनी गावांमध्ये शाळा चालवल्या गेल्या, धान्य वाटले गेले आणि क्रांतिकारकांना मदत करण्यात आली. जेव्हा कुणी विचारले, "तुम्ही चोरी केली का?" भाऊ हसून म्हणाले: "आम्ही चोरी केली नाही. इंग्रजांनी आम्हाला वर्षानुवर्षे लुटले आहे. आम्ही तर आपल्या लोकांसाठी फक्त थोडंसं परत घेतलं आहे, याला चोरी का म्हणायचं?"

कॅप्टन भाऊंचं मन फार मोठं होतं. त्यांनी कधीही भीतीला जवळ येऊ दिलं नाही. भारत स्वतंत्र झाल्यानंतरही त्यांनी समाजसेवा सुरू ठेवली. ते १०० वर्षे जगले आणि २०२२ मध्ये जगाचा निरोप घेतला.

**शिकवण:** देशासाठी काही करण्यासाठी वयाचं बंधन नसतं. सत्य आणि धैर्यापेक्षा मोठं दुसरं शस्त्र नाही. संकटसमयी काही लहान मुलेही हिरो होऊ शकतात! कॅप्टन भाऊंसारख्या लोकांमुळेच आज आपण मोकळेपणाने श्वास घेऊ शकतो. त्यांची तुफान सेना भलेही मुलांची होती, पण त्यांची कामगिरी मोठ्यांपेक्षा महान होती.

# कथा

## भारताच्या महान स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात नायकांच्या

### गणेश शंकर विद्यार्थी

***ठिकाण:*** *इलाहाबाद, उत्तर प्रदेश*



ही कथा आहे एका अशा नायकाची, ज्याने ना तलवार घेऊन लढा दिला, ना बंदुकीने... पण तरीही ज्याच्या शौर्याची उदाहरणे दिली जातात. नाव होते — गणेश शंकर विद्यार्थी. एक असे सैनिक, ज्याने **लेखणीला शस्त्र बनवले आणि सत्य व मानवतेसाठी लढा दिला.**

गणेश शंकर विद्यार्थी यांचा जन्म 1890 मध्ये उत्तर प्रदेशातील इलाहाबाद जिल्ह्यात झाला. अभ्यासात हुशार, विचाराने स्पष्ट, आणि मनात देशासाठी ज्वाला. अतिशय कमी वयात ते पत्रकारितेकडे वळले आणि लवकरच **'प्रताप'** नावाचे एक वृत्तपत्र सुरू केले.

या वृत्तपत्रातून त्यांनी इंग्रजांच्या जुलुमांविरुद्ध, शेतकऱ्यांच्या हालांविरुद्ध आणि सामाजिक अन्यायाविरुद्ध आवाज उठवला. इंग्रजांना हे सहन झाले नाही, आणि त्यांना अनेक वेळा तुरुंगात टाकण्यात आले. पण विद्यार्थीजींनी कधी हार मानली नाही.

ते फक्त पत्रकारच नव्हते, तर खरे समाजसेवकही होते.

स्वातंत्र्य संग्रामाला कमकुवत करण्यासाठी इंग्रजांनी "फूट पाडा आणि राज्य करा" ही योजना राबवली. त्याअंतर्गत त्यांनी मुद्दाम हिंदू आणि मुस्लिम समाजामध्ये भांडणे लावली. 1931 साली कानपूरमध्ये भयंकर दंगे झाले. पण गणेश शंकर विद्यार्थी हिंसा थांबवण्यासाठी स्वतः रस्त्यावर उतरले. **हिंदू असूनही त्यांनी अनेक मुस्लिमांचे जीव वाचवले.**

याच प्रयत्नात, **जमावाने त्यांची हत्या केली.** ते शहीद झाले.

पण त्यांच्या बलिदानाने दाखवून दिले की खरा देशभक्त तोच, जो सर्वांना जोडण्याचे काम करतो — मग त्यासाठी स्वतःचा जीव गेला तरी बेहत्तर.

**शिकवण:** गणेश शंकर विद्यार्थी यांची कथा आपल्याला शिकवते की, समाज बदलासाठी फक्त घोषणाबाजी नाही, तर बलिदानाचीही गरज असते. गणेश शंकर विद्यार्थी यांसारखे लोक आपल्या हृदयात अंधारातही प्रकाश देणार्या दिव्यासारखे नेहमीच जिवंत राहतील.